# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

### कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ११७ शाळांना संरक्षण भिंती नसल्याबाबत

**(१) ३४७०० (२१-०२-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधार (जि.नांदेड) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ११८ शाळा असून त्यापैकी ११७ शाळांना संरक्षण भिंती नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळांसारख्या महत्वाच्या ठिकाणी मोकाट जनावरांना अटकाव करणे गरजेचे असतांना संरक्षण भिंती नसल्याने त्याचा शिक्षणावर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या शाळांना संरक्षक भिंतीसाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

कंधार तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १८८ शाळांपैकी १०१ शाळांना संरक्षण भिंत नाही.

(२) संरक्षण भिंत नसल्याने शिक्षणावर परिणाम होत आहे अशी बाब नाही.

(३) ज्या शाळांमध्ये पक्की संरक्षक भिंत नाही, तेथे तारेचे कुंपण, डिडोनिया/ मेहंदी यासारख्या वनस्पतींचे कुंपण घालण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्हातील महाविद्यालयामध्ये तहसिलदार व नायब तहसिलदार यांच्या डिजीटल स्वाक्षरीने देण्यात आलेले दाखले अवैध ठरविण्यात येत असल्याबाबत

**(२) ३६६४८ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील शाळा-महाविद्यालयामध्ये तहसिलदार व नायब तहसीलदार यांच्या डिजिटल स्वाक्षरीने दिलेले उत्पन्न, वय, अधिवास राष्ट्रीयत्व हे दाखले शाळा व महाविद्यालयात अवैध व बोगस असल्याचे कारण दाखवून नाकारण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळा व महाविद्यालयांच्या या कारवाईमुळे पालक व विद्यार्थ्यांची कुचंबणा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हे सर्व दाखले माहिती व तंत्रज्ञान अधिनियमानुसार वैध असतानाही नाकारण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) दाखले नाकारले जात आहेत अशी बाब नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या शाळाच्यां धोकादायक इमारतीबाबत**

**(३) ३८३९६ (२१-०१-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयात जिल्हा परिषदेच्या निजामकालीन काळामध्ये बांधकाम करण्यात आलेल्या शाळेच्या इमारती अजुनही उपलब्ध आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास एकूण किती इमारती धोकादायक आहेत व त्यापासून विद्यार्थ्याचे जीवीतास धोका पोहचु शकतो हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१८) :** (१) होय.
(२) ४० निजामकालीन शाळा इमारती जीर्ण झाल्या आहेत तथापि धोकादायक वर्गखोल्यात विद्यार्थी बसविले जात नाहीत.
(३) वर्गखोली दुरूस्ती / बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/ दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळांनी स्वतंत्र व्दिभाषिक पुस्तके तयार करण्याबाबत**

**(४) ४५५३९ (१६-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषद आणि मनपा हद्दीतील अनेक शाळांना सेमी इंग्रजी करण्याची सक्ती केल्याचे शिक्षकांच्या तक्रारी असल्याचे तसेच राज्यातील जिल्हा परिषदांनी सेमी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना परवानगी देताना या शाळांसाठी इंग्रजीतुन शिकविण्यात येणाऱ्या विषयांचा अभ्यासक्रम आणि पुस्तके स्वतंत्रपणे तयार करण्यात यावी असे म्हटल होते मात्र प्रत्यक्षात स्वतंत्र व्दिभाषिक पुस्तके तयार करण्यात आली नसल्याचे गंभीर बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२२-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुरुकुल पब्लिक स्कूल, परतवाडा (ता.अचलपूर, जि.अमरावती) शाळेच्या संस्था अध्यक्षांनी विद्यार्थी-पालकांची केलेली दिशाभूल**

**(५) ५२८३७ (२५-०५-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुरुकुल पब्लिक स्कूल, परतवाडा (ता.अचलपूर, जि.अमरावती) शाळेच्या संस्था अध्यक्षांनी विद्यार्थी-पालकांची दिशाभूल करून फसवणूक केल्यामुळे सदर संस्थाध्यक्षा विरोधात गुन्हे दाखल करून शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ रोजी जिल्हाधिकारी अमरावती यांचेकडे लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेने शाळा प्रशासन, विद्यार्थी आणि पालक विरोधी कृती करून आदर्श शाळा संहितेचा भंग केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार संबधित शाळा व शाळासंचालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०९-२०१८) :** (१) व (२) सदर शाळेच्या कारभाराबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.

(३) याबाबत चौकशी करुन शिक्षणाधिकारी यांनी शाळेवर कारवाईबाबतचा अहवाल शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात ११ वी वर्गात प्रवेश घेण्यासाठी भूमिपूत्रांना प्राधान्याने प्रवेश मिळाण्याबाबत**

**(६) ६०९६० (२२-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात गत अनेक वर्षापासून ११ वीच्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी परजिल्ह्यातील विद्यार्थी येत असून, स्थानिक विद्यार्थ्यांना ७० टक्के तर बाहेरच्या विद्यार्थ्यांना ३० टक्के कोटा आहे, जिल्ह्यात १४२ अनुदानित आणि ७७ विना अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांची संख्या असल्याने तसेच या महाविद्यालयातील प्रवेश क्षमता ४० हजार ६०० असून ७०, ३० टक्क्यांचा विचार केला तर ६ हजार ८४२ स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार असल्याचे माहे जून, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार भूमिपूत्रांना महाविद्यालयांत प्राधान्याने प्रवेश मिळावा यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (३०-०९-२०१८) :** (१) व (२) इ.११ वी ची प्रवेश प्रक्रिया मा.उच्च न्यायालयाने वेळावेळी दिलेल्या निर्देशानुसार गुणवत्तेनुसार करण्यात येते. या प्रक्रियेमध्ये स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. सबब, अशी तरतूद करता येईल किंवा कसे याबाबत विचारविनिमय करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी, विधी व न्याय विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची समिती गठीत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या मुलांची शैक्षणिक फी तसेच परिक्षा शुल्क माफ करण्याबाबत**

**(७) ६३९५३ (२२-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात गत ४ वर्षापासून भीषण दुष्काळ पडला असून काही ठिकाणी गारपीट व कर्जबाजारीपणामुळे कित्येक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे त्यांच्या पाल्यांची शैक्षणिक फी तसेच परिक्षा शुल्के भरणे अशक्य असल्याने, दुष्काळग्रस्त भागातील सर्व विद्यार्थ्यांचे परिक्षा शुल्क शैक्षणिक फी माफ करावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांच्याकडे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली असल्याचे निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१), (२) व (३) होय.

सद्यःस्थितीत शालेय शिक्षण विभागामार्फत इ. १० वी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना व इ. १२ वी पर्यंत मुलींना प्रमाणित दराने मोफत शिक्षण दिले जाते. सदर योजनेचा लाभ आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यांना सुद्धा लागू आहे. महसुल व वन विभागाने वेळोवेळी घोषित केलेल्या दुष्काळग्रस्त गावातील विद्यार्थ्यांना इ. १० वी व इ. १२ वीच्या परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती / माफ करण्यात येते. शालेय शिक्षण विभागाच्या दि. १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयानुसार राज्य मंडळ, पुणे यांचेमार्फत इ. १० वी व इ. १२ वीचे परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती /माफ करण्यात येते.

महसुल व वन विभागाच्या दि.२३ जानेवारी, २००६ च्या शासन निर्णयानुसार आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या वारसांना रु.१.०० लक्ष मदत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यात १५ टक्के लोक निरक्षर असल्याबाबत

**(८) ६६४६६ (०५-०१-२०१७). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरोळ (जि. कोल्हापूर) तालुक्यात १५ टक्के लोक निरक्षर असल्याचे जिल्हा परिषदेच्या निरंतर शिक्षण विभाग अधिकारी यांनी माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आणले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तालुक्यात साक्षरता प्रचार व प्रसार कार्यक्रम निरंतर शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) निरंतर शिक्षण कार्यक्रम सप्टेंबर २००९ पासून केंद्र शासनाने बंद केलेला आहे. तथापि, भारतात ज्या जिल्ह्यामध्ये महिला साक्षरतेचे प्रमाण ५० टक्के पेक्षा कमी आहे, अशा जिल्ह्यांमध्ये राष्ट्रीय साक्षरता अभियान प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या निर्देशान्वये साक्षर भारत योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील जालना, हिंगोली, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, बीड, गडचिरोली, नंदूरबार व गोंदीया या १० जिल्ह्यांमध्ये मार्च २०१८ अखेरपर्यंत साक्षर भारत योजना सुरू होती.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**क्रिडा स्पर्धाकरिता खुल्या गटासाठी वाढीव क्रिडागुण देण्याबाबत**

**(९) ६८५०५ (१६-१२-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाने क्रिडा स्पर्धाकरिता खुल्या गटासाठी वाढीव क्रिडागुण देण्यात येऊ नये अशी अट घालण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच, जिल्हा स्तर विभाग राज्य, राष्ट्रीय स्तर या क्रमाने क्रिडागुण देण्याची सवलत देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, जिल्हा राज्य राष्ट्रीय अशी स्पर्धा घेऊन विभागीय क्रिडास्पर्धांची अट शिथील करावी, तसेच दिनांक २० ऑगस्ट, २०१५ च्या शासन निर्णया मध्ये दुरूस्ती करण्याची मागणी महाराष्ट्र आमतौर जिमनॅस्टीक असोसिएशन यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,
(४) असल्यास या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना इ.१० वी व इ.१२ वी मध्ये वाढीव सवलतीचे गुण देण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अनुदानित शाळेत केंद्रीय बोर्डाच्या शाळा सुरु करण्यास अवैधरित्या परवानगी दिल्याबाबत**

**(१०) ६९५३७ (२७-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई दादर पूर्व येथील एसएससी बोर्डाच्या अंतर्गत राज्य शासन अनुदानित राजे शिवाजी महाविद्यालयात केंद्रीय बोर्डाच्या सीबीएससी व आयसीएससी शाळा सुरु करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसएससी बोर्डा अंतर्गत असलेल्या शाळेत, केंद्रीय बोर्डाच्या शाळा कोणता कायदा व नियमाच्या आधारे सुरु करण्यास शासनाने मान्यता दिली आहे व त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू केंद्रीय बोर्डाची शाळा अनाधिकृतपणे सुरु असल्यास या शाळे विरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-०९-२०१८) :** (१) नाही.
(२), (३), व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**करंजफेण (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत**

**(११) ८५५५७ (२३-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) करंजफेण (ता.पन्हाळा जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळाही गावाबाहेर २ किमी लांब असलेल्या इमारतीत घेण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळेच्या इमारतीचा पाया खचला असून भिंतीना येणाऱ्या ओलाव्यामुळे इमारत धोकादायक बनली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त शाळा भाड्याच्या खोलीत चालविली जात असून २ किमी लांब असल्याने विद्यार्थ्यांना रोज पायपीट करावी लागत असल्याने विद्यार्थ्यांचे शालेय नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

शाळेतील २ वर्गखोल्या धोकादायक झाल्याने २ वर्ग गावाबाहेर भाडयाच्या इमारतीत भरविण्यात येत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

शाळेतील ७ पैकी दोन वर्गखोल्या धोकादायक बनल्या आहेत.

(३) शाळेतील केवळ दोन वर्ग धोकादायक झाल्याने इतरत्र भरविले जात आहे. परंतु तेथे नियमित अध्यापन सुरू असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.

(४) धोकादायक वर्गखोल्या निर्लेखित करून जिल्हा नियोजन समिती/ सर्व शिक्षा अभियान या माध्यमातून वर्गखोली बांधकाम करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जामखेड (जि.अहमदनगर) शहरातील असलेली जिल्हापरिषदेची सदाफुले वस्ती या शाळेची झालेली दुरवस्था**

**(१२) ८६२७० (२३-०८-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामखेड (जि.अहमदनगर) शहरातील जिल्हापरिषदेची सदाफुले वस्ती या शाळेच्या भिंतीना तडे गेले असून पत्रेही खराब झाले असल्यामुळे इमारतीमध्ये उंदीर, घुशी, साप, डुकरे इ. प्राणी येत आहेत तसेच पावसाळयात शाळेत मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने शाळेतील विदयार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाल्याचे दिनांक १५ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शाळेने मा. पालकमंत्री व गटशिक्षण अधिकारी यांच्याकडे पाच महिन्यापूर्वी विविध मागण्यासंदर्भात निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, असल्यास, चौकशीनुसार सदर शाळेची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सदाफुले वस्ती येथील जिल्हा परिषद शाळेतील ३ वर्गखोल्या जीर्ण झाल्या होत्या व ४ वर्गखोल्यांना दुरूस्तीची आवश्यकता निर्माण झाली होती. तथापि विद्यार्थ्यांच्या जिवीतास धोका निर्माण झालेला नाही.
(२) शाळेच्या मुख्याध्यापकांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे ३ वर्गखोल्यांच्या निर्लेखनाचा प्रस्ताव पाठविला होता.
(३) ३ वर्गखोल्या निर्लेखित करण्यात आल्या असून ४ वर्गखोल्याची दुरूस्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील जूहू येथील एकॉल मांडीयाल शाळेसाठी शासकीय जागा भाडेतत्वांवर दिल्याबाबत

**(१३) ९१३८१ (२३-०८-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील जूहू येथील एकॉल मांडीयाल शाळेला शासनाने शाळेसाठी शासकीय जागा भाडेतत्वांवर दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शासकीय जागा शाळेसाठी भाडेतत्वांवर देतांना शासनाने काही अटी व शर्ती ठेवल्या होत्या काय,
(३) असल्यास, सदर अटी व शर्ती काय आहेत,
(४) असल्यास, सदर शाळा शासनाच्या अटी व शर्ती चे उल्लंघन करीत असून आरटीई अंतर्गत तसेच गोरगरीब विदयार्थ्यांनासुध्दा शाळेमध्ये प्रवेश देण्यात आलेला नाही हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीअंती सदर शाळेवर शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.

(३) एकूण २४ अटी शर्ती घालण्यात आल्या आहेत.
(४) शाळा अटी शर्तीचे उल्लंघन करित असलेबाबतची तक्रार प्राप्त नाही तसेच सदरची शाळा अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त शाळा असल्याने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ अंतर्गत वंचित दुर्बल घटकातील प्रवेश देण्याचा प्रश्न येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेलू (जि.परभणी) तालुक्यातील तब्बल १८२ शाळांच्या वर्ग खोल्यांच्या दुरवस्थेबाबत**

**(१४) ९३७५७ (२३-०८-२०१७). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेलू (जि.परभणी) तालुक्यातील १८२ शाळांच्या वर्ग खोल्यांची दुरवस्थाझाली असल्याची बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, उक्त वर्ग खोल्याची दुरुस्ती शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी करणे आवश्यक असूनही सदर दुरुस्ती न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत चौकशी केली आहे काय, व त्यानुसार यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
सेलू तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ११२ शाळांपैकी ६२ शाळांतील वर्गखोल्यांना दुरूस्तीची आवश्यकता आहे.
(२) हे खरे नाही.
धोकादायक वर्गखोल्यांत विद्यार्थी बसविले जात नाहीत.
(३) वर्गखोली दुरूस्ती/ बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/ दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या इमारतीची दूरवस्था झाली असल्याबाबत**

**(१५) ९५९०१ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील अलकापूर, समनापूर, पेमगिरी, संगमनेर खुर्द, नांदुरी दुमाला, पिंपळगाव कोंझिरासह तळेगावच्या भागवतवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या इमारतीची दुरावस्था झाली असून धोकादायक शाळांचे प्रस्ताव पंचायत समतीने केंद्रप्रमुख व मुख्याध्यापकांकडून मागवण्यास सुरुवात केली असून अनेक शाळांच्या खोल्या मोडकळीस आल्या असल्याने एकाच खोलीत दोन-दोन वर्ग घेण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडे धोकादायक शाळांचे एकूण किती प्रस्ताव प्राप्त झाले आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर शाळांची डागडुजी वा नुतनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

संगमनेर तालुक्यातील अकलापूर, समनापूर, संगमनेर खुर्द, नांदुरी दुमाला, पिंपळगाव कोंझिरा, भागवतवाडी येथील जिल्हा परिषद शाळांतील ३३ वर्गखोल्या नादुरूस्त आहेत. तथापि धोकादायक वर्गखोल्यांत विद्यार्थी बसविले जात नाहीत.

(२) व (३) संगमनेर तालुक्यातील २६ निर्लेखन प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ३६ खोल्यांच्या निर्लेखनाचे ९ प्रस्ताव मंजूर करण्यात आले आहेत. तसेच वर्गखोली दुरूस्ती/ बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम / दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (जि.रायगड) येथील ७८ शाळांकडे मैदाने नसल्याबाबत**

**(१६) ९६३७३ (२९-१२-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व शाळांना मैदान असणे सक्तीचे असतांनाही पनवेल (जि.रायगड) येथील ७८ शाळांकडे मैदाने नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या शाळेतील विद्यार्थी रस्त्यावर तसेच शाळेच्या गच्चीवर खेळत असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यानुसार उक्त शाळांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) व (२) पनवेल तालुक्यातील ५६० शाळांपैकी ५२ शाळांना क्रिडांगण उपलब्ध नाही. तथापि विद्यार्थी रस्त्यावर तसेच शाळेच्या गच्चीवर खेळत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) ज्या शाळांना क्रीडांगण नाही, त्या शाळांना क्रीडांगणासाठी, जिल्हा परिषदेची किंवा ग्रामपंचायतीची किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांची मोकळी जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कानुर धनगरवाडा अतिदुर्गम व डोंगराळ भागातील प्राथमिक शाळेला नविन इमारत उपलब्ध करुन देणेबाबत**

**(१७) ९६९२० (२९-१२-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील कानुर धनगरवाडा ही अतिदुर्गम व डोंगराळ भागातील कुडाच्या भिंती असलेली प्राथमिक शाळा गत पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत १५ वर्षांपासून शासनाने या शाळेच्या दुरुस्तीसाठी अनुदान दिले नसल्याने ग्रामस्थांनीच या शाळेच्या डागडुजीची कामे केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे व त्याअनुषंगाने या शाळेला नविन इमारत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) कानूर धनगरपाडा हया वसाहती सभोवतालची जमीन वन विभागाची आहे. वन विभागाकडून ग्रुप ग्रामपंचायतीला शाळेसाठी हस्तांतरीत करण्यात आलेली जागा ग्रामपंचायतीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या नावे केली असून शाळेच्या इमारत बांधकामासाठी तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेची झालेली दुरवस्था**

**(१८) ९८३०६ (२९-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (ता.मेहकर, जि.बुलढाणा) येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेला १०० वर्षे पूर्ण झाली असून सदरच्या शाळेची अत्यंत दुरावस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार या शाळेच्या दुरुस्तीसंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा परिषद शाळा ब्रम्हपूरी येथील ७ पैकी ५ वर्गखोल्या मोडकळीस आल्यास आहेत.

(२) व (३) पटसंख्येनुसार आवश्यक वर्गखोल्यांसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच वर्गखोली बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिति व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेरा (जि.बुलढाणा) येथील उर्दु शाळा व परिसरात अस्वच्छ व दुर्गंधीयुक्त वातावरण झाले असल्यबाबत**

**(१९) ९८६५१ (२९-१२-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेरा (जि.बुलढाणा) येथील उर्दु शाळा व परिसरात अस्वच्छता व अत्यंत दुर्गंधीयुक्त वातावरण पसरलेले असल्याने त्याचा उक्त शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

मेरा येथील उर्दू शाळेच्या परिसरात ऑक्टोबर, २०१७ मध्ये अस्वच्छता होती. परंतु त्याचा

विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे आढळून आले नाही.
(२) शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी नोव्हेंबर, २०१७ मध्ये तपासणी करून शाळा परिसर स्वच्छ ठेवण्याच्या सूचना संबंधितांस दिल्या होत्या. तद्नंतर दिनांक २/०१/२०१८ दिलेल्या भेटीत शाळा परिसर स्वच्छ होता.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला येथील क्रिडा प्रबोधिनीचे प्राचार्य पद व रेक्टर ही दोन्ही पदे रिक्त असल्याबाबत**

**(२०) ९९४८५ (२९-१२-२०१७). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला येथील क्रिडा प्रबोधिनीचे प्राचार्य पद व रेक्टर ही दोन्ही पदे रिक्त असल्याचे माहे, ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, सदर क्रिडा प्रबोधिनिची इमारत मोडकळीस आली असून तेथे सोयी सुविधांचा अभाव तसेच क्रिडा पटुंना निकृष्ट दर्जाचे अपुरे जेवण दिले जाते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर क्रिडा प्रबोधिनीची इमारत नवीन बांधून स्वच्छता बरोबरच क्रिडापटुंना सकस व पुरेसे जेवण देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
क्रीडा प्रबोधिनी, अकोला येथील रिक्त असलेल्या प्राचार्य या पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री.सतिशचंद्र भट, राज्य क्रीडा मार्गदर्शक व रेक्टर या पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा क्रीडा अधिकारी, अकोला या कार्यालयातील कनिष्ठ लिपिकाकडे सोपविण्यात आलेला आहे.
(२) नाही.
अकोला येथील क्रीडा प्रबोधिनी ही जिल्हा क्रीडा संकुल, अकोला या इमारतीत सुरु असून सदरची इमारत सुस्थितीत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**औरंगाबाद येथील मोहसिन अहमद उर्दू प्राथमिक व माध्यमीक शाळेच्या संस्थाचालकांनी नियमाचे उल्लंघन केल्याबाबत**

**(२१) ९९६०५ (२९-१२-२०१७). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील मोहसिन अहमद उर्दू प्राथमिक व माध्यमीक शाळा (जुने नांव कस्तुरबा

गांधी), बषीर कॉलनी, रोषन गेट, येथे शाळेच्या संस्थाचालकांनी नियमांचे उल्लंघन करुन इमारती व क्रिडागंणाविना फक्त ५०० चौ. फुटाच्या जागेत शाळा सुरू असल्याची तक्रार केली असल्याची बाब दिनांक १ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधीत संस्थाचालकांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) होय.

(२) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी तपासणी केली असून आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने शाळेवर कार्यवाही करण्याच्या दृष्टीने शाळेस नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुरूपात मिळणा-या लाभाचे रूपांतर रोख स्वरूपात थेट विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्याबाबत**

**(२२) ९९७६३ (२९-१२-२०१७). डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध कल्याणकारी योजनांमध्ये वस्तुरूपात मिळणा-या लाभाचे रूपांतर रोख स्वरूपात थेट विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाशी निगडीत बँक खात्यात जमा करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड/ग्रामीण बँकेत शून्य रकमेचे लाभार्थी खाते उघडण्याबाबत शालेय शिक्षण विभाग आणि संबंधित शिक्षणाधिका-यांनी शाळांवर सक्ती करण्यास सुरुवात केली असून बँका मात्र केवायसीशिवाय विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडण्यास तयार नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गणवेश अनुदानासाठी लाभार्थ्यांचे शून्य बॅलन्सवर खाते उघडण्याच्या अग्रणी बँकेच्या आदेशानंतरही राष्ट्रीयकृत बॅकाकडून नकार देण्यात आल्याने जळगाव जिल्हयातील एक लाख विद्यार्थी गणवेश अनुदानापासून वंचित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ च्या सुमारास निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थितीत राज्यातील ज्या विद्यार्थ्यांची बँकांमध्ये खाती नाहीत त्या विद्यार्थ्यांना कोणत्याही योंजनांचा लाभ मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय् असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) नाही.
(२), (३) व (४) जळगाव जिल्ह्यामध्ये मोफत गणवेश वाटप योजनेचे एकूण १,६१,३७० इतके लाभार्थी विद्यार्थी असून माहे सप्टेंबर, २०१७ अखेरपर्यंत ६४०४१ विद्यार्थ्यांची बँकेत खाती उघडण्यात आली असून त्यापैकी ४५१६८विद्यार्थ्यांच्या खात्यावर गणवेश योजनेचा निधी वर्ग करण्यात आला होता.

सद्यःस्थितीत १,३५,१२० विद्यार्थ्यांची बँक खात्याची माहिती उपलब्ध झाली आहे. त्यापैकी १,२४,०४९ विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात सदर योजनेच्या लाभाची रक्कम जमा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हा परिषद शाळांच्या २३८ इमारती (वर्गखोल्या) जीर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(२३) १०१९८७ (३०-१२-२०१७). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हा परिषद शाळांच्या २३८ इमारती (वर्गखोल्या) जीर्ण अवस्थेत असून त्या पासून विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होवू शकतो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळांची भौगोलिक स्थिती व अन्य माहिती शासनाकडे युडायसवर मुख्याध्यापकांनी पाठविली असताना सुद्धा या गंभीर बाबीकडे दुर्लक्ष झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा परिषद शाळांच्या १४ इमारती धोकादायक असून २३७ शाळांना मोठी दुरूस्ती आवश्यक आहे. तथापि धोकादायक शाळांत विद्यार्थी बसविण्यात येत नाहीत.
(२) व (३) निधीची उपलब्धता व वर्गखोली बांधकाम/ दुरूस्तीची निकड या बाबी विचारात घेवून बांधकाम/ दुरूस्तीची कामे करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर शहर व जिल्हयातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँका व खाजगी बँका शैक्षणिक कर्ज देण्यामध्ये टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(२४) १०२५९० (१३-०७-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर शहर व जिल्हयातील उच्च शिक्षण घेत असलेल्या विदयार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँका व खाजगी बँका शैक्षणिक कर्ज देण्यासाठी टाळाटाळ करीत असल्याने मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य धोक्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील ज्या शेतकऱ्यांचे पिक कर्ज थकीत आहे, त्या शेतकऱ्यांच्या मुलाला शैक्षणिक कर्ज १०० टक्के नाकारण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे का, चौकशीत काय आढळून आले तसेच चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१८) :** (१) उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत उच्च शिक्षणाकरीता शैक्षणिक कर्ज देण्याची कोणतीही योजना राबविण्यात येत नाही.

तथापि, केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून व्यावसायिक तसेच तांत्रिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुसूचित बँकाकडून प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजात सूट मिळण्यासाठी Central Scheme of Interest subsidy for Educational loan ही योजना घोषित केली आहे. सदर योजना केंद्र शासनाद्वारे अनुसूचित बँकाकडून राबविण्यात येते. सदर योजनेसाठी कॅनरा बँकेची नोडल बँक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर योजनेमध्ये राज्य शासनाची भूमिका नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसईतील २५ जिल्हा परिषद शाळा अत्यंत धोकादायक अवस्थेत असलेबाबत**

**(२५) १०२८५२ (२९-१२-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसईतील जिल्हा परिषदेच्या २५० शाळांच्या दुरुस्तीचा प्रश्न असताना २५ जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीचे छप्पर व भिंतीना भेगा पडून शाळेच्या इमारती मोडकळीस आल्या असल्याचे दिनांक १२ नोव्हेंबर २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत शासनाचा लाखो रुपयांचा निधी असतानाही शाळांच्या इमारतींची दुरुस्ती करण्यात येत नसून निधीचा अपहार केला जात आहे,

हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

वसई तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १९७ शाळा असून त्यापैकी ८ शाळांच्या इमारती धोकादायक आहेत.
(२) सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१६-१७ मध्ये १४ मोठया दुरूस्तीची कामे करण्यात आली असून सन २०१७-१८ मध्ये १६ मोठया दुरूस्ती कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. सदर कामांत कुठेही अपहार झाल्याचे आढळून आलेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज योजना पुन्हा कार्यान्वित करण्याबाबत**

**(२६) १०२९१७ (१३-०७-२०१८). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज योजना सन २०१६ पासून बंद केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६ पूर्वी कर्ज घेणाऱ्यांनाही २०१६ नंतरचा कर्ज टप्पा देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने गरीब व शेतकरी मुलांच्या शैक्षणिक हितासाठी हि योजना तातडीने पुन्हा कार्यान्वित करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.उच्च शिक्षण मंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१८) :** (१) उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत उच्च शिक्षणाकरीता शैक्षणिक कर्ज देण्याची कोणतीही योजना राबविण्यात येत नाही.

तथापि, केंद्र शासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून व्यावसायिक तसेच तांत्रिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुसूचित बँकाकडून

प्राप्त होणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजात सूट मिळण्यासाठी Central Scheme of Interest subsidy for Educational loan ही योजना घोषित केली आहे. सदर योजना केंद्र शासनाद्वारे अनुसूचित बँकाकडून राबविण्यात येते. सदर योजनेसाठी कॅनरा बँकेची नोडल बँक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

या विषयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या पत्राबाबतचा अभिलेख या विभागामध्ये उपलब्ध नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नगर जिल्हयात एक हजाराहून अधिक शाळांच्या खोल्या मोडकळीस आल्याबाबत**

**(२७) १०३२१९ (२९-१२-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगर जिल्हयात एक हजाराहून अधिक शाळांच्या खोल्या मोडकळीस आल्या असल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन वर्ग खोल्यात बसावे लागत असल्याने त्यांच्या मध्ये भितीचे व चिंतेचे वातावरण पसरले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्या नुसार सदरहू शाळांच्या वर्ग खोल्यांची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अहमदनगर जिल्हयात १६६९ शाळांतील ४५७७ वर्गखोल्यांना दुरूस्तीची आवश्यकता आहे. परंतु धोकादायक वर्गखोल्यांत विद्यार्थ्यांना बसविण्यात येत नाही.

(२) वर्गखोली दुरूस्ती/बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कबड्डी संघटनेच्या अधिकाऱ्यांनी निवड झालेल्या महिला कबड्डी पटूला वैद्यकीय दृष्ट्या अपात्र ठरविण्यात आल्याबाबत**

**(२८) १०५४४२ (०६-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार**

**(ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हैद्राबाद येथे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पासून सुरु होणाऱ्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धासाठी जाहिर झालेल्या महाराष्ट्र संघाचे सराव शिबीर कराड (जि.सातारा) येथे आयोजित करण्यात आले असता संघासोबत असलेल्या व्यवस्थापकांनी महिला कबड्डीपटूची अचानक वैद्यकीय तपासणी करुन अपात्र ठरवून स्पर्धेतून बाद करण्यात आल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनने, पुण्याची प्रतिभावान खेळाडू अम्रपाली गलांडे हिला डॉक्टरांच्या अहवालानुसार, अनफिट करुन ऐनवेळी महाराष्ट्र संघातून वगळण्याचा दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी निर्णय घेतला असून वैद्यकीय अहवाल प्राप्त न होताच असोसिएशनने आम्रपालीला अनफिट करुन संघातून वगळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून व त्यानुसार क्रीडा पट्टूवर अन्याय होऊ नये तसेच क्रीडा क्षेत्र निकोप रहावे याकरिता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१), (२) व (३) नाही.

६५ व्या वरिष्ठ गट पुरुष/महिला राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा दि. ३१/१२/२०१७ ते ०५/०१/२०१८ दरम्यान हैद्राबाद येथे पार पडल्या. सदर स्पर्धेच्या प्रशिक्षण सराव शिबीरात सहभागी महिला खेळाडू श्रीमती आम्रपाली गलांडे यांना दि. २७/१२/२०१७ रोजी वैद्यकीय कारणास्तव त्यांच्याच सल्ल्याने संघ व्यवस्थापकाने स्थानिक डॉक्टरांकडे नेले होते. त्यांनी खेळाडूस विश्रांतीचा सल्ला दिला होता. तसेच सदर स्पर्धेचे प्रवेश अर्ज स्वीकारण्याची मुदतदेखील दि. २७/१२/२०१७ अशी होती. श्रीमती गलांडे यांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्या स्पर्धेतील सहभागाऐवजी अन्य खेळाडूस ऐनवेळी संधी देण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनने घेतला होता.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन ही स्वतंत्र स्वायत्त खेळ संघटना आहे. सदर संघटनेवर शासनाचे कोणतेही थेट नियंत्रण नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शाळा खोल्यांची झालेली दुरवस्था**

**(२९) १०५७४२ (०६-०४-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३० जिल्हा परिषद शाळांमधील शाळा खोल्या जीर्ण झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जिवितास धोका निर्माण झाला असून सदर शाळा खोल्या निर्लेखित करून नवीन खोल्या बांधण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थ्यांच्या सुरक्षा व सुविधा लक्षात घेवून नवीन शाळा खोल्या बांधण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
येवला तालुक्यातील ३० जिल्हा परिषद शाळांतील ८२ वर्गखोल्या निर्लेखित करण्याचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले होते. पाहणी अंती तालुकास्तरीय निर्लेखन समितीने प्रस्तावित केलेनुसार १६ शाळांतील ३६ वर्गखोल्या निर्लेखनास जिल्हा परिषदेने मंजूरी दिली आहे.
(२) वर्गखोली दुरूस्ती/ बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/ दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरातील शासनाच्या माध्यमिक शाळामध्ये प्रवेश विद्यार्थ्यांची घट होत असल्याबाबत

**(३०) १०६४२७ (०६-०४-२०१८). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरातील शासनाच्या १४९ माध्यमिक शाळामधील सन २०१५-१६ या वर्षात इयत्ता ७ वीच्या वर्गात सुमारे ४८,३७७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, गतवर्षी इयत्ता ८ वीच्या वर्गात सुमारे ३०,०५३ इतके विद्यार्थी दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने सातत्याने विद्यार्थ्यांची होणारी घट पाहता याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधून सर्व भौतिक व शैक्षणिक सुविधा प्राधान्याने पुरविण्यात येत आहेत.

इंग्रजी शाळांकडे असलेला पालकांचा कल लक्षात घेता इ. १ ली पासून इंग्रजी माध्यम सुरू करण्यात आले आहे.

त्याचबरोबर शालेय पोषण आहार,सर्व शिक्षा अभियान, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना,मुलींना उपस्थिती भत्ता,
मोफत गणवेश व लेखन साहित्य,विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना,विविध शिष्यवृत्या या सारख्या योजना
तसेच लेक वाचवा लेक शिकवा अभियान,शाळा प्रवेशोत्सव यासारखे उपक्रम शिक्षण हक्क कायद्याची कटाक्षाने अंमलबजावणी करण्यासाठी अंमलात आणण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) पंचायत समिती अंतर्गत असलेल्या खैरव गट ग्रामपंचायतीच्या बारलिंगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या खोलीची दुरावस्था झाल्याचे**

**(३१) १०६६३४ (०६-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा पंचायत समिती अंतर्गत (जि.बुलढाणा) असलेल्या खैरव गट ग्रामपंचायतीच्या बारलिंगा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या खोलीची दुरावस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदरील वर्गखोल्या दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) होय. बारलिंगा येथील जिल्हा परिषद शाळेतील एक वर्गखोली नादुरूस्त आहे.

(२) वर्गखोली दुरूस्तीची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथिल शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात कौशल्य विकासाकरीता अल्पकालीन अभ्यासक्रम सुरू करणेबाबत**

**(३२) १०७०४० (०७-०४-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात जिल्हा नियोजन समिती अंतर्गत वेगवेगळ्या कौशल्य विकासाचे अल्पकालीन प्रशिक्षण घेवू शकतील असे एका वेळेस १२० विद्यार्थी बसतील इतक्या क्षमतेचे रूपये ५० लक्ष निधी खर्च करून उभारण्यात आलेल्या "सेंटर ऑफ एक्सलेन्स इन जेम्स ॲन्ड ज्वेलरी" मध्ये सहा महिने उलटून गेले तरी कोणतेही अभ्यासक्रम (कोर्स) सुरू झाले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्यानास आले आहे वा त्या दरम्यान, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यस त्यानुसार सदरहू ठिकाणी कौशल्य विकासाकरीता अल्पकालीन कोर्स सुरू करणेबाबत कोणी उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) होय.

(२) कौशल्य विकासाकरीता अल्पकालीन कोर्स सुरू करणेबाबत शासनाकडून पुढील उपाययोजना करण्यात येत आहेत:-

अ) शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर या संस्थेकडून महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन क्रेंद्र, कोल्हापूर यांचेकडे जेम्स ॲन्ड ज्वेलरी सेक्टरमधील एकूण ३० अभ्यासक्रमांना मान्यता देणेकरीता ऑनलाईन नोंदणी करण्यात आली होती. त्यास अनुसरून NCVT मार्फत निश्चित केलेल्या निकषानुसार संस्थेने मागणी केलेल्या ३० अभ्यासक्रमांपैकी आवश्यक यंत्रसामुग्री उपलब्ध असलेल्या १८ अभ्यासक्रमांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडून मान्यता देण्यात आली आहे.

ब) माहे सप्टेंबर, २०१७ अखेर महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीकडील शिल्लक निधीमधून याआधी मंजूरी दिलेल्या प्रशिक्षण तुकडयांचे प्रशिक्षण शुल्क अदा करावयाचे असल्याने माहे ऑक्टोंबर-२०१७ पासून "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान" या योजनेअंतर्गत नव्याने प्रस्तावित केलेल्या प्रशिक्षण तुकडयांना मंजुरी देण्याच्या प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली आहे.

क) तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या दिनांक २६.१२.२०१७ रोजीच्या शासन निर्णयांन्वये "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता अभियान" अंतर्गत प्रशिक्षण तुकडयांना मंजुरी प्रदान करावयाची सुधारीत कार्यपध्दती मंजूर करण्यात आली असून त्यानुसार प्रशिक्षण तुकडयांना मान्यता देण्याची कार्यवाही कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत करण्यात येत आहे. यास्तव सद्यस्थितीत प्रशिक्षण सुरू झालेले नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील तरवडी गावातील पुनर्वसित जागा व शाळेचा वाद निर्माण झाल्याबाबत**

**(३३) १०७८८९ (०६-०४-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यातील तरवडी गावातील पुनर्वसित जागा व शाळेचा वाद निर्माण झाल्यामुळे तरवडी येथील शाळेची जागा हरवली असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री व मा.शिक्षण मंत्री यांच्याकडे त्याचबरोबर लोकअदालतीमध्ये माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान सामाजिक कार्यकर्ते यांनी केली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तक्रारीनुसार शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) याबाबत तक्रार प्राप्त आहे.
(२) दिनमित्रकार मुकुंदराव पाटील माध्यमिक विद्यालय, तरवडी, ता.नेवासा यांनी तरवडी येथील गट नं.३९ मध्ये केलेल्या अतिक्रमणाबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे मराठीमाध्यमाच्या शाळेतील आवश्यक विद्यार्थी संख्या नसल्याबाबत

**(३४) १०९२२४ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बालकांचा शिक्षणाचा मोफत व सक्तीचा अधिकार अधिनियम २००९ नुसार विद्यार्थ्यांसाठी परिसरात १ ते ३ कि.मी. परिसरात राहण्याची अट बंधनकारक करण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास इंग्रजी माध्यमाच्या शाळांमुळे मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेशासाठी अनैसर्गिक स्पर्धा निर्माण झाली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास खाजगी मराठी प्राथमिक/माध्यमिक शाळांना आवश्यक विद्यार्थी संख्या प्राप्त नसल्याने मराठी शाळेतील शिक्षकांना वेगवेगळया मार्गाने विद्यार्थी जमवावे लागतात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांची झालेली दुरवस्था**

**(३५) १०९५०२ (०६-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांचे गळके छत, तडे गेलेल्या भिंती, संरक्षक भिंतीचा अभाव, आजूबाजूच्या परिसरात अस्वच्छता असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने या शाळांची पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त पाहणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

लोणार तालुक्यातील ८९ जिल्हा परिषद शाळांपैकी १५ शाळांतील २५ वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून १० शाळांतील २१ वर्गखोल्यांना दुरूस्ती आवश्यक आहे. सर्व शाळांना संरक्षक कुंपण उपलब्ध आहे. तसेच शाळांचा परिसर अस्वच्छ असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) वर्गखोली दुरूस्ती/ बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम/ दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्थेस निधी न मिळाल्याबाबत**

**(३६) १०९९५८ (०५-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात स्थापन करण्यात आलेल्या गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन या संस्थेस दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १५० कोटी रुपये मंजूर करण्यात आलेला निधी अद्यापही मिळाला नसल्याची बाब माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संस्थेच्या उभारणीसाठी निधी देण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात संस्थेसाठी निधीची तरतूद न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार संस्थेस त्वरित निधी देण्यासंदर्भातकोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दिनांक ४ ऑक्टोबर, २०१६ च्या मा.मंत्रिमंडळाच्या बैठकीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये गोपीनाथ मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था स्थापन करण्याच्या प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) सदर संस्थेद्वारे १) Rural Development and Research, २) Rural Economics, Banking and Industry, ३) Conservation of Biodiversity व ४) Rural Technology हे ४ विभाग पहिल्या टप्प्यात सुरु करण्यात येणार आहेत. मा.मंत्रिमंडळाने तत्वतः मान्यता दिल्याप्रमाणे मा.अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार सदर संस्थेसाठी पहिल्या वर्षी रु.३ कोटी, दुसऱ्या वर्षी रु.४ कोटी व तिसऱ्या वर्षी रु.५ कोटी असे ३ वर्षात एकूण रु.१२ कोटी उपलब्ध करुन देण्यास शासनाने मान्यता दिली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दौंड (जि.पुणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांच्सा नवीन वर्गखोली बांधकाम व शाळांची दुरुस्ती करणेबाबत

**(३७) ११०७२५ (०६-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६९ शाळांच्या नवीन वर्गखोली बांधकाम ७९ शाळांची दुरुस्ती तसेच शौचालय युनिट व संरक्षण भिंत बांधकाम करणेबाबतचा प्रस्ताव गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी जिल्हा परिषदेकडे दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ व १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देणेबाबत वा शाळांची दुरुस्तीसह शौचालय युनिट

व संरक्षण भिंत बांधकाम तसेच नवीन बांधकाम करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) होय.
(२) हे खरे नाही.
(३) जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेली २७ शाळांच्या दुरूस्तीची कामे प्रगतीपथावर असून उर्वरित वर्गखोली बांधकाम / दुरूस्तीची कामे निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती/ सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून करण्याची तजवीज ठेवली आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जवळगा (ता.रेणापूर, जि.लातूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वर्ग खोल्यांचे बांधकामाबाबत**

**(३८) १११९८५ (०६-०४-२०१८). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जवळगा (ता.रेणापूर जि.लातूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ५ वर्गखोल्या विद्यार्थ्यांना बसण्यास धोकादायक झाल्यामुळे सदर वर्गखोल्यांचे बांधकाम करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद लातूर यांच्याकडे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर रेणापूर व औसा तालुक्यात अशा एकूण किती जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोल्या धोकादायक झाल्या आहेत तसेच या वर्गखोल्यांचे बांधकाम व दुरुस्तीसाठी एकूण किती निधीची आवशकता आहे,
(३) असल्यास याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार वर्गखोल्यांचे बांधकाम व दुरुस्तीसाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) होय.
(२) लातूर रेणापूर व औसा तालुक्यात एकूण ५५ वर्गखोल्या धोकादायक झाल्या असून त्यांच्या दुरूस्तीसाठी अंदाजे ४ कोटी ४४ लक्ष रूपये निधीची आवश्यकता आहे.
(३) वर्गखोली दुरूस्ती / बांधकामाची निकड व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा नियोजन समिती व सर्व शिक्षा अभियानातून बांधकाम / दुरूस्तीची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद हायस्कुल, खेडी (पान्हेरा), (ता.मोताळा, जि.बुलडाणा) ला स्वमालकीची इमारत नसल्याबाबत**

**(३९) १११४७० (०६-०४-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेडी (पान्हेरा) (ता.मोताळा, जि.बुलडाणा) येथील सन १९७० साली स्थापन झालेल्या जिल्हा परिषदेच्या शाळेला स्वमालकीची इमारत नसल्याने विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळेत शिक्षणासाठी जावे लागत असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळाचे मैदान नसल्याने विद्यार्थ्यांची प्रचंड गैरसोय होऊन गुणवत्तेवर परिणाम होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त बाबत शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त शाळेला स्वमालकीची इमारत मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे शहर व ठाणे ग्रामीण या दोन्ही जिल्हयाच्या संघामध्ये गत आठ वर्षापासून स्थान दिले जात नसल्याबाबत**

**(४०) ११२६९० (०६-०४-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहर व ठाणे ग्रामीण या दोन्ही जिल्हयाच्या संघामध्ये गत आठ वर्षापासून स्थान दिले जात नसल्यामुळे नवी मुंबईच्या कुस्तीपटूपुढे कोणत्या जिल्हा संघाकडून खेळायचे असा संभ्रम निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१) व (२) नाही, सदरच्या स्पर्धा शासनाद्वारे आयोजित करण्यात येत नाहीत. त्यांचे आयोजन महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषेदमार्फत करण्यात येते. नवी मुंबई मधील कुस्तीगीरांनी ठाणे ग्रामीण संघाच्या निवड चाचणीमध्ये सहभाग घेतला असल्याचे व नवी मुंबईमधील कोणत्याही कुस्तीगीरास ठाणे ग्रामीण संघाच्या निवड

चाचणीमध्ये सहभागी होण्यास अडवणूक केली जात नसल्याचे सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषद यांनी शासनास कळविले आहे. सदर खेळ संघटना हि स्वायत्त संघटना असल्याने यावर शासनाचे थेट नियंत्रण नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा परिषद कार्यालय (जि.औरंगाबाद) येथील शाळा दफनभूमीत भरत असल्याबाबत**

**(४१) ११४१५४ (०६-०४-२०१८). श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जिल्हा परिषद कार्यालय (जि.औरंगाबाद) येथील शिक्षणाधिकारी यांचे मार्फत करण्यात आलेल्या तपासणीत शहरातील एक शाळा दफनभूमीत भरत असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) तसेच उस्मानपुरा परिसरातील उर्दू शाळाची तपासणी झाली तेंव्हा प्राथमिक शाळा ही दफन भूमीत भरत असल्याचे निदर्शनास आले हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, औरंगाबाद जिल्हयात एकूण १३०० खासगी प्राथमिक विना अनुदानित शाळा असून बहूसंख्य शाळेत पिण्यासाठी पाणी, खोल्या कमी असणे तसेच भौतिक सोयी सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.
(४) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील तरतूदींनुसार भौतिक सुविधा अपूर्ण असलेल्या शाळांना तात्काळ पूर्तता करण्याबाबत नोटीसा देण्याची कार्यवाही केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आर्थिकदृष्ट्या दुर्भल घटकातील विद्याथ्यांना राज्यातील खासगी शाळांमध्ये असलेल्या २५ टक्के आरक्षीत जागांवर प्रवेश न देणा-या शाळांची मान्यता रद्द करण्याबाबत**

**(४२) ११४६५० (०६-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खासगी शाळांमध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना असलेल्या २५ टक्के आरक्षीत जागांवर प्रवेश न देणा-या शाळांची मान्यता रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाच्या अनुषंगाने कोणत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी करण्यात येणार आहे,
(३) असलस, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा रण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे जिल्हयातील ३७७४ प्राथमिक शाळांपैकी १२७० वर्गखोल्या मोडकळीस आल्याबाबत

**(४३) ११६५२५ (२४-०५-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियान योजने अंर्तगत शाळांच्या इमारतींसाठी निधी दिला जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे जिल्हयातील ३७७४ प्राथमिक शाळांपैकी १२७० वर्गखोल्या मोडकळीस आल्या असून १२७० नवीन वर्गखोल्यांची आवश्यकता असल्याचेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून, आले व त्यानुसार वर्गखोल्या दुरुस्ती व निर्मिती साठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
सन २००१-०२ पासून सर्व शिक्षा अभियान योजने अंतर्गत शाळांच्या इमारतींना निधी दिला जातो.
(२) अंशत: खरे आहे.
३६७४ शाळांपैकी ५०५ शाळांतील १२७० वर्गखोल्या मोडकळीस आलेल्या असून ५६४ नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामाचे प्रस्ताव सादर झाले आहेत.
(३) निधीची उपलब्धता व वर्गखोली दुरूस्ती / बांधकामाच्या निकडीनुसार वर्गखोल्यांच्या दुरूस्ती / बांधकामाची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्य शासनाच्या सेवेतील खेळाडूंना सरावासाठी सवलत मिळण्याबाबत

**(४४) ११८०७८ (२०-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या सेवेतील खेळाडूंना सरावासाठी सवलत देण्याबाबत धोरण तयार केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णयही जाहीर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासन निर्णयात कबड्डी, खो-खो, क्रिकेट या खेळांचा समावेश करण्यात आला असून इतर खेळांचा समावेश नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार इतर खेळांचा समावेश असलेला सुधारित शासन निर्णय जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे,

दि.२३.०९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये, अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत भाग घेतलेल्या सचिवालय जिमखान्याच्या खेळाडूंना सरावासाठी, दुपारी ३.३० वा. कार्यालय सोडण्याची सवलत देण्यात आली आहे. सदर सवलत क्रिकेट, फुटबॉल, कबड्डी व ॲथलेटिक्स या खेळांच्या स्पर्धेसाठी अनुज्ञेय आहे.

(४) नाही, याबाबत कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील २ कोटी विदयार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह विमा काढण्यात येणार असल्याबाबत

**(४५) १२०४७४ (२३-०७-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही विदयार्थ्यांचा आई-वडीलांच्या अपघाती मृत्यु नंतर आर्थिक भार परवडण्यासारखा नसल्याने शिक्षणाचा मार्ग बंद होतो ही परिस्थिती विदयार्थ्यांवर ओढवू नये याकरिता २ कोटी विदयार्थ्यांचा त्यांच्या पालकांसह विमा काढण्यात येईल अशी घोषणा शासनाने केली असल्याचे दिनांक १५ मे, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विमा योजनेच्या माध्यमातून अशा विदयार्थ्यांचे पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत करण्यात येईल असेही शासनाने जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, यात आई-वडीलांच्या अपघाती मृत्यूचा उल्लेख असल्याने आई-वडीलांचा आकस्मित मृत्यू झाल्यावरही या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळणार आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या घोषणेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) यावर पुढील कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माझगाव(मुंबई) येथिल सेंट पिटर शाळेवर कारवाई करण्याबाबत**

**(४६) १२१२४८ (२३-०७-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई माझगाव सेंट पिटर या आय सी एस ई बोर्डाच्या शाळेने पहिली ते आठवी च्या अनेक विद्यार्थ्यांना नापास केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आठवीपर्यंत विद्यार्थांना नापास करता येत नाही अशी तरतूद शिक्षण हक्क कायद्यात असताना देखील याची अंमलबजावणी केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्या अनुषगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१) अशंत: खरे आहे.
(२) खरे आहे.
(३) संबंधित शाळेने शिक्षण हक्क अधिनियमातील तरतुदीनुसार विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश दिला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील शाळांना पुर्नमान्यता देण्याबाबत**

**(४७) १२१९२९ (२३-०७-२०१८). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पालिका प्रशासन आणि संस्था चालकांच्या हलगर्जी कारभारामुळे तसेच या शाळांनी दर तीन वर्षांनी अनिर्वाय असणारी पुनर्मान्यता न घेतल्याने शाळेच्या वैधतेबाबत प्रश्न निर्माण होऊन ४७८ शाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ४९ अनुदानित तर ४२९ विनानुदानित शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील एकूण ४७८ शाळा पुनर्मान्यता घेतल्याशिवाय सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यामध्ये ४५ अनुदानित मराठी शाळा तर विनानुदानित ३६० इंग्रजी शाळा आणि ४२ मराठी शाळांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुनर्मान्यतेचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

मान्यता मुदतवाढ देण्यासाठी मनपाच्या व बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील अटी व शर्तींची पूर्तता संस्था चालकांनी न केल्यामुळे अनुदानित ११४ व विना अनुदानित ४२७ अशा एकुण ५४१ शाळांचे मान्यता मुदतवाढ देण्याचे प्रस्ताव सुरु आहेत. तथापि सदर शाळा नियमितपणे सुरु असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही.

(२) यामध्ये ४९ अनुदानित व ४२७ विनाअनुदानित शाळा आहेत.

(३) ११४ अनुदानित व ४२७ विनाअनुदानित शाळांचे पुनर्मान्यता प्रस्ताव सुरु आहेत.

(४) यामध्ये ७४ मराठी अनुदानित शाळांचा आणि विनाअनुदानित ३६० इंग्रजी व ४० मराठी शाळांचा समावेश आहे.

(५) यासंदर्भात पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाकडून होत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनुबोधपट, माहितीपट, व लघुपटांच्या दुर्मिळ चित्रफितींना बुरशी लागल्याबाबत**

**(४८) १२२१९८ (२३-०७-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना पुस्तकी शिक्षणाला पूरक ठरतील याकरिता १९३८ ते १९९३ या काळातील गोळा करण्यात आलेल्या अनुबोधपट, माहितीपट, लघुपटांच्या १२०० दुर्मिळ चित्रफितीना बुरशी लागून खराब झाल्याने त्यावर "राईट ऑफ" नोंद करण्यात आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त दुर्मिळ चित्रफीती वाचविण्याकरिता तसेच त्याचा वापर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०९-१०-२०१८) : (**१) हे खरे नाही.
(२) राष्ट्रीय फिल्म संग्रहालयामार्फत डिजीटलायझेशन व जतन केले जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील धोबी तलाव येथील शासनाची शिक्षण व्यवसाय, मार्गदर्शन आणि निवडसंस्था बंद करण्याच्या निर्णयाबाबत**

**(४९) १२२४१२ (२०-०७-२०१८). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धोबी तलाव येथील सन १९५० पासून कार्यरत असलेली शासनाची शिक्षण व्यवसाय व मार्गदर्शन व निवडसंस्था बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संस्थेमध्ये अ ते ड संवर्गातील एकूण प्रत्येकी किती अधिकारी व कर्मचारी सध्या कार्यरत आहेत,
(३) असल्यास, उक्त संस्था बंद करण्याचा निर्णय घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व ज्या उद्देशाने सदर संस्था राज्यात सुरु करण्यात आली होती तो उद्देश आता कालबाह्य झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उक्त संस्था बंद केल्यानंतर उक्त संस्थेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पर्यायी समायोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१८) :** (१) अंशत : खरे आहे.
(२) सदर संस्थेमध्ये अ ते ड संवर्गातील एकूण ११ कर्मचारी सध्या कार्यरत आहेत.
(३) नाही.
(४) सदर कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची कारवाई सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अष्टविनायक इंग्लिश स्कूल (जि.लातूर) या शाळेविरुध्द असलेल्या तक्रारीबाबत**

**(५०) १२५७४७ (२३-०७-२०१८). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर (जि.लातूर) येथील अष्टविनायक इंग्लिश स्कूल ही शाळा शासनाने मंजूर केलेल्या जागेत न चालविता तसेच संबंधित विभागाची कोणतीही पुर्व परवानगी न घेता अनधिकृतपणे अन्यत्र चालविली जात असल्याबाबतची तक्रार पालकांनी शिक्षणाधिकारी, लातूर यांचेकडे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे हे खरे आहे काय.

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणांची चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-१०-२०१८) :** (१) सदर शाळेबाबत शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे तक्रार प्राप्त झाली होती.

(२) प्रस्तुत प्रकरणाची चौकशी केली आहे. सदर शाळा परवानगी दिलेल्या विहित ठिकाणी भरविण्याबाबत शिक्षणाधिकारी यांनी सूचना दिल्या असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.